* सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील १५%. फी वाढ तपशील खालीलप्रमाणे :

| इयत्ता | फी २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|
| लहान गट | १७०००/- | १९५५० /- |
| मोठा गट | १२५००/- | १४३७५/- |
| इ. १ ली | ११०००/- | १४२९६/- |
| इ. २ री | ११५००/- | १४८७१/- |
| इ. ३ री. | १२०००/- | १५४४६/- |
| इ. ४ थी | १२५००/- | १६०२९/- |

सूचक - १) श्री. ओटी रमेश मोहन
२) सौ. फराटे रुपाली कृष्णा

अनुमोदन - १) श्री. लोखंडे राजेंद्र सखाराम

# शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ, शिरूर

## विद्याधाम प्राथमिक शाळा, शिरूर

सन - २०२४-२५

## पालक शिक्षक संघ सभा इतिवृत्त

दिनांक - २१।०२।२०२५
वार - शुक्रवार
स्थळ - विद्याधाम प्राथमिक शाळा, शिरूर.

आज शुक्रवार दि - २१।०२।२०२५ रोजी पालक शिक्षक संघाची सन - २०२४-२५ या वर्षाची सभा विद्याधाम प्राथमिक शाळेत ठीक - ३·०० वाजता आयोजित करण्यात आली. या सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित सर्व पालक प्रतिनिधींचे स्वागत टाळ्यांच्या गजरात करण्यात आले.

या सर्वसाधारण सभेत मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले. सौ. उंडे मॅडम यांनी इतिवृत्ताचे वाचन केले.

यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ. मुळे मॅडम यांनी सभेचे विषय वाचले. त्यानंतर विषयानुसार चर्चा करण्यात आली.

विषय क्रमांक - १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

दिनांक ५ डिसेंबर रोजी झालेल्या पालक शिक्षक संघाच्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सौ. उंडे मॅडम यांनी केले.

विषय क्रमांक २ - शालेय गणवेशाबाबत चर्चा करणे.

गेल्या २० वर्षापासून शालेय गणवेश एकच असल्याने सन - २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी आणि पालकांना नाविन्य वाटावे यासाठी शालेय गणवेश बदलण्याबाबत काही नमुने दाखवून

त्यावर चर्चा करण्यात आली.

ठराव क्र. २

शालेय गणवेश बदलण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३ – वार्षिक पारितोषिक गुणगौरव समारंभाविषयी चर्चा करणे.

वार्षिक पारितोषिक गुणगौरव समारंभ दि. २८ फेब्रुवारी या दिवशी स. ११.३० वाजता घेण्याबाबत चर्चा करण्यात आली.

ठराव क्र. ३

वार्षिक पारितोषिक गुणगौरव समारंभ घेण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक-४ – वार्षिक फी वाढीबाबत चर्चा करणे.

दोन वर्षांनंतर शालेय फी मध्ये १५%. वाढ होत असते. सन - २०२५-२६ पासून हिंदी व लॅंग्वेज लॅब यांचाही समावेश शालेय वेळापत्रकात करण्यात येणार आहे तसेच मूल्यवर्धन उपक्रमही सुरु ठेवण्यात येणार आहे. या सर्वांचा सारासार विचार करुन शालेय फी वाढीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच दाखला व बोनाफाईड फी मागील वर्षाप्रमाणेच राहील. कोणत्याही इयत्तेत नवीन प्रवेश दिल्यास त्या विद्यार्थ्यांना १९,५५०/-रु. इतकी फी राहील. असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्र. ४ –

सन २०२५-२६ व सन् २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी वार्षिक फी १५% ने वाढ करण्याबाबत ठराव सर्वानुमते मंजूर.

बालवाडी लहान गट - १९५५०/-
बालवाडी मोठा गट - १४३७५/-
इ. १ ली - १४२९६/-

इ. २ री - १४८७१/-
इ. ३ री - १५४४६१/-
इ. ४ थी - १६०२९१/-

सूचक - श्री. औटी रमेश मोहन
सौ. फराटे रुपाली कृष्णा

अनुमोदन - श्री. लोखंडे राजेंद्र सखाराम

विषय क्रमांक ५ - तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन या विषयी चर्चा करणे.

आरोग्य तपासणीच्या वेळी ज्या मुलांच्या वैयक्तिक समस्या निदर्शनास आल्या त्याविषयी पालकांना तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळावे याविषयी चर्चा करण्यात आली.

ठराव क्र. ५

पालकांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाचा ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक - ६ - इ. १ ली पासून लॅंग्वेज लॅब सुरु करण्याबाबत चर्चा करणे.

सनॅको कंपनीचे सॉफ्टवेअर आपल्या संगणक कक्षात उपलब्ध केले आहे. विद्यार्थ्यांचे उच्चार सुधारण्यासाठी इ. १ ली पासून सर्व मुलांसाठी लॅंग्वेज लॅब सुरु करण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यासाठी स्पेशल शिक्षकाची नेमणूक सन २०२५-२६ मध्ये करण्यात येणार आहे अशी चर्चा करण्यात आली.

ठराव क्र. ६

इ. १ ली पासून लॅंग्वेज लॅब सुरु करणे व त्यासाठी स्पेशल शिक्षकाची नेमणूक करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर